# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दुरध्वनी / फॅक्स : २५६५६२३४, E-Mail : ropune.dte@gmail.com; Website www.ropune.org.in


जा.क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/सुसेआप्रयो/२०२०/3604 दिनांक : 22 OCT 2020

## परिपत्रक

**विषय :- सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेबाबत गट क व गट ड पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची माहिती ---**

संदर्भ :- १. शासन निर्णय,वित्त विभाग निर्णय क्रमांक वेतन १११९/प्र.क्रं.३/२०१९/सेवा-३,दि.०२/०३/२०१९
२. या कार्यालयाचे पत्र क्रं.तंशिविकापु/आस्था-३(अ)/सुसेआप्रयो/२०२०/३१९८दि.०८/१०/२०२०

सर्व संस्था प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयातील तरतूदी नुसार तसेच संदर्भ क्रं.०२ अन्वये आपल्या संस्थेतील / कार्यालयातील गट-क व गट-ड संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांना पुर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२/२४ वर्षानंतर (दिनांक ०१/०१/२०१६ ते दिनांक ३१/०३/२०१९ पर्यतच्या कालावधीत) यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे. त्यांना १०/२०/३० वर्षानंतर अनुज्ञेय असणारी तीन लाभांची सुधारीत सेवातंर्गत आश्वासित योजना लागू करण्याकरीता तसेच ज्या कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०१/२०१६ नंतर दिनांक ३१/०३/२०२१ पर्यतच्या कालावधीत सेवेची १०-२०-३० वर्ष पुर्ण होत आहेत अशा गट क व गट ड कर्मचाऱ्यांची माहिती मागविण्यात आलेली होती.

सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेची बैठक **दिनांक २६/१०/२०२० रोजी व दिनांक २७/१०/२०२० रोजी** आयोजित करण्यात आली असून माहिती सादर करतांना खालील बाबींची तपासणी करण्यात येवून अचूक माहिती सादर करावी.

१. संवर्गातील प्रथम नियुक्तीचा दिनांक, पदनाम, जन्म दिनांक
२. असाधारण रजा (विनावेतन) असल्यास त्या त्या कालावधीचा तपशील
३. कर्मचा-यास सेवा कालावधीत प्रत्यक्ष पदोन्नती/ प्रत्यक्ष देण्यात आलेले लाभ यांची गणना करुन माहिती सादर करावी.
४. ज्या दिनांकास १०/२०/३० नुसार कर्मचारी लाभास पात्र होत असेल त्या दिनांकानुसार मत्ता व दायित्वे सादर केल्याची नोंद घ्यावी.
५. ज्या दिनांकास १०/२०/३० नुसार कर्मचारी लाभास पात्र होत असेल त्या दिनांकानुसार मागील ५ वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी सादर करण्यात यावी.
६. सेवापुस्तकात घेण्यात आलेल्या नोंदींच्या अनुषंगाने संगणक अर्हता, मराठी/हिंदी भाषा सूट, विभागीय परीक्षा उत्तीर्ण अथवा सूट (लिपीकवर्गीय कर्मचा-यांसाठी), जातवैधता प्रमाणपत्र नोंद, पहिला लाभ/दुसरा लाभ मिळाल्यांच्या नोंदी, चारित्र्य पडताळणी नोंद इत्यादी ठिकाणी फ्लॅग लावण्यात यावेत.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी –**
संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय संस्था/कार्यालये,
पुणे विभाग

टिप : दिनांक २६/१०/२०२० रोजी पुण्यातील सर्व संस्था यांनी उपस्थित रहावे.

सकाळी १०.३० वाजता शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी खुर्द
सकाळी ११.०० वाजता शासकीय तंत्रनिकेतन, पुणे
सकाळी १२.०० वाजता अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे

**पुण्याबाहेरील सर्व संस्था यांनी दिनांक २७/१०/२०२० रोजी उपस्थित रहावे.**